# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

page
18 Jul 20

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# वाढती लोकसंख्या एक भयानक समस्या : प्रा. राजेमहाडिक

* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

पाटण, दि. १७ जुलै : आज आपल्या सर्वांच्या समोर वेगवेगळ्या प्रकारची आव्हाने आहेत आपल्याला आपल्या देशाची व स्वतः ची प्रगती करावयाची असेल तर प्रत्येकाने मनावर निर्बंध घातलेच पाहिजे. सद्यस्थितीत सर्वांच्या समोर वाढती लोकसंख्या ही फार मोठी समस्या बनली आहे त्यास आळा घालने गरजेचे आहेअसे प्रतिपादन प्रा.राजेमहाडिक एस पी यांनी बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना, भूगोल विभाग अर्थशास्त्र विभाग व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस डी पवार होते यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. बी ए चव्हाण .जूनियर विभागाचे समन्वयक प्रा. व्ही एस माधने व्यवसाय ,शिक्षण विभाग प्रमुख प्रा.एस ए. गायकवाड भूगोल विभाग प्रमुख बी डी लोहार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. राजेमहाडिक पुढे म्हणाले की वाढती लोकसंख्या ही जगाची समस्या बनली आहे त्यासंबंधी जागर होणे गरजेचे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताचा लोकसंख्येच्या बाबतीत दुसरा क्रमांक होता परंतु सद्यस्थितीचा



विचार करता आपल्या देशाचा जगात पहिला क्रमांक आहे याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर व विकासावर होत आहे आणि म्हणूनच प्रत्येकाने प्रत्येक गोष्टीची काळजी घेतली पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस डी पवार म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येचा प्रत्येक गोष्टीवर परिणाम होतो बेकारी ही एक जटिल समस्या बनली आहे अनेक तरुणांच्या विवाहाच्या समस्या निर्माण होत आहेत त्याचा परिणाम देशाच्या विकासावर होत आहे आणि प्रत्येक तरुणा आपण देशाचे नागरिक आहोत याचे भान ठेव आपले कर्तव्य योग्य रीतीने पार पाडणे गरजे आहे आपला देश येणाऱ्या काळात आर्थि महासत्ता बनेल कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर के शिर्के यांनी केले आभार गव्हाणे ए यांनी मांडले कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थि रेड रिबन क्लबचे विद्यार्थी भूगोल विषया विद्यार्थी अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी आ राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते